


# सम्राज्ञीचा तारा

## (सितारा: कैसरा:)


लेखक

**हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी**

**अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी**

# सितारा:कैसर:

## (सम्राज्ञीचा तारा)

लेखक

**हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी**

अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी

पुस्तकाचे नाव: सितारा कैसरः
लेखक: हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी (अ.स)
अनुवादक: इक़बाल अहमद
स्वरूपन व सेटिंग: खान मामून अहमद एतेज़ाज़
(मुरब्बी-एम.ए.मराठी)(इंचार्ज मराठी विभाग)
प्रकाशन वर्ष: २०२४
संख्या: २००
प्रकाशक: मुद्रण व प्रकाशन विभाग,कादियान-१४३५१६
जिल्हा गुरदासपूर, (पंजाब)
मुद्रण : फजले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान, भारत.

Name of the book: Sitarah Qaisarah
Writer: Hazrat Mirza Ghulam Ahmad
Qadiani,The Promised Messiah
Translator: Iqbal Ahmad
Formatting&Setting: Khan Mamoon Ahmed Etyzaz
(Murabbi Silsila-M.A. Marathi, Incharge Marathi Desk)
Edition: 2024
Quantity: 200
Publisher: Nazarat Nashr-o-Isha'at,
Qadian, 143516
Printed at: Fazl-e-Umar Printing Press,
Qadian, Dist. Gurdaspur,
(Punjab) INDIA

# प्रकाशकीय

हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद साहेब कादियानी, अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी (त्यांच्यावर कृपा असो) यांनी लिहिलेली पुस्तक ''**सितारा: कैसर:**''चे मराठी भाषांतर मा. इक्बाल अहमद साहेब यांनी केले आहे आणि मा. डॉ. बशारत अहमद साहेब (समीक्षा समिती प्रमुख, मराठी), मा. खान मामून अहमद (प्रमुख मराठी विभाग), श्री. अमतुस सलाम कौनेन (एम.ए.) यांनी या पुस्ताकचे मुद्रणलेखन केले आहे. अल्लाह या सर्वांना त्यांच्या प्रयत्नांचे उत्तम प्रतिफल देवो.

हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद, अपेक्षित मसीहाचे पाचवे खलीफा व सद्यकालीन धर्मगुरू (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) यांच्या स्वीकृतीने या पुस्ताकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येत आहे.

विनीत

हाफ़िज़ मख़दूम शरीफ

प्रमुख, मुद्रण व प्रकाशन विभाग, क़ादियान.

## काहीं संक्षिप्त शब्दः


खालील मराठी मजकूरात आलेल्या अरबी शब्दांचे संक्षिप्त अक्षरे दिलेली आहेत, त्यांचे अर्थ व स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेतः-

(स.) - हे अक्षर ''सल्लल्लाहु अलैहिवसल्लम'' यांचे संक्षिप्त रूप म्हणून आहे. याचा अर्थ, अल्लाहची कृपा व शांती त्यांना लाभो, असा होतो. हे प्रार्थनात्मक शब्द विशेषकरून श्रेष्ठतम प्रेषित मुहंमद (स.) साठी वापरले जाते.

कलमा - धर्मसुत्र; ''ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलूल्लाह'' - अल्लाह व्यतिरिक्त कोणीही उपासनेस पात्र नाही आणि मुहंमद (स.) हे त्यांचे प्रेषित आहे.

(अ.स.) - ''अलैहिस्सलाम'' प्रेषित महंमद (स.) यांच्या व्यतिरिक्त जगात प्रकट झालेल्या सर्व प्रेषितांचा नाव उच्चारल्यावर (अ.स.) म्हणतात. याचा अर्थ, त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो, असा होतो.

(र.जि.) - हे अक्षर ''रज़ियल्लाहु अन्हु'' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ ' अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला' असा होतो. हे शब्द प्रेषित मुहम्मद (स.) तसेच 'अपेक्षित मसीह व इमाम महदी' यांच्या सोबतींच्या नावानंतर उच्चारले जातात.



हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी
अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी(अ.स)

# लेखक परिचय

हजरत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी (अ.स.) यांचा जन्म भारतातील 'कादियान' (जि.गुरदासपूर) या गावात १८३५ मध्ये झाला. लहानपणापासून ते ईशभक्ती, प्रार्थना, नमाज़, पवित्र कुरआन आणि इतर धार्मिक पुस्तकांचे अध्ययन करण्यात तल्लीन असायचे. त्यावेळी इस्लामवर चोहोरबाजूंनी आक्रमण होत होते, इस्लामची ही दयनीय अवस्था पाहून त्यांना खूप वाईट वाटत असे. इस्लामचे रक्षण करण्यासाठी आणि त्याची शिकवण आपल्या रूपात जगासमोर मांडण्यासाठी, त्यांनी ९० हून अधिक पुस्तके रचली आणि हजारो लेख प्रसिद्ध केले आणि अनेक धार्मिक स्पर्धा व सभा आयोजित केल्या. त्यांनी आवर्जून सांगितले की, इस्लाम तो जिवंत धर्म आहे, जो मानवाला, त्याच्या वास्तविक निर्मात्याशी नाते प्रस्थापित करू शकतो आणि त्याचे पालन करून मनुष्य व्यावहारिक आणि आध्यात्मिक प्रगती करू शकतो. लहानपणापासूनच त्यांना खरी स्वप्ने, दिव्यदर्शन आणि ईशवाणी होत होत्या. १८८९ मध्ये, सर्वशक्तिमान अल्लाहच्या आदेशानुसार त्यांनी इस्लामच्या खऱ्याखुऱ्या शिकवणूकीच्या प्रचार-प्रसारासाठी एका पवित्र पंथाची स्थापना केली आणि त्यासोबतच दीक्षा परंपरा सुरू केली. ईशवरीय संबोधनाची आणि संभाषणाची परंपरा सातत्याने दिवसेंदिवस प्रगतीशील होत राहिली आणि अल्लाहच्या आदेशानुसार, त्यांनी

युगावतार असण्याचा दावा केला, (तोच सुधारक व अवतार) ज्याबद्दल सर्व धर्मांमध्ये विविध नावाने भविष्यवाण्या नमूद होत्या.

तसेच त्यांनी पवित्र पैगंबर (स.) यांच्या भविष्यवाणीनुसार अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी होण्याचाही दावा केला. अहमदिया मुस्लिम जमाअत आजतागायत २०० पेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत आहे.

१९०८ मध्ये त्यांच्या निर्वाणानंतर, पवित्र कुरआन आणि पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या भविष्यवाण्यांनुसार, त्यांच्या आध्यात्मिक ध्येयाच्या पूर्ततेसाठी खिलाफत परंपरा सुरू झाली. आज हजरत मिर्ज़ा मसरूर अहमद (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) हे त्यांचे पंचम खलीफा (उत्तराधिकारी) आणि विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअतचे इमाम आहेत.

# प्रस्तावना

हे पुस्तक २४ ऑगस्ट १८९९ रोजी प्रकाशित झाले. या पुस्तकात, 'तोहफा-ए-कैसरियाः' मध्ये विशद केलेल्या विषयाला, नव्या शैलीत पुनरावृत्तीच्या उद्देशाने रेखाटले गेले आहे आणि वास्तविक पाहता हे पुस्तक तोहफा-ए-कैसरियाः चे संस्मरण आहे. या ग्रंथात इंग्रजी सरकारने बहाल केलेल्या धार्मिक उदारता आणि धार्मिक स्वातंत्रेचा उल्लेख करून जे त्याने सर्व धर्मांना समान प्रमाणात दिले होते त्याचे वर्णन करत ख्रिस्ती मतांचे अतिशय उत्तम शैलीत निराकरण केले आहे, तसेच लेखकाने जिहादच्या संकल्पनेबद्दल गैरसमज देखील सार्थ रितीने दूर केले आहे आणि स्पष्टपणे नमूद केले आहे की इस्लामचा प्रसार तलवारीने कधीच झाला नाही किंवा इस्लाममध्ये धार्मिक सक्तीची परवानगी नाही. आणि सरतेशेवटी हजरत गुलाम अहमद कादियानी, यांनी अपेक्षित मसीह होण्याचा दावा सिद्ध केला आहे.

# महामान्य आदरणीय महाराणी कैसरा: हिन्द भारत आणि इंग्लंडची सम्राज्ञी
## (अल्लाह त्यांची प्रतिष्ठा कायम ठेवो)

सर्वप्रथम सर्वशक्तिमान परमेश्वराशी अशी प्रार्थना आहे की आमच्या या महामान्य कैसरा: हिन्द यांना दीर्घायू लाभो आणि प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीत वाढ होवो, कुटूंब व अपत्यांच्या कुशलतेमुळे डोळे थंड राहो. या नंतर या पत्राचे लेखक, ज्याचे नाव **मिर्ज़ा ग़ुलाम अहमद क़ादियानी** आहे, जो पंजाबच्या एका छोटे गाव **कादियान** येथे राहतो, जे लाहोरपासून जवळपास सत्तर मैल अंतरावर, पूर्व उत्तर च्या कोपऱ्यामध्ये जिल्हा गुरदासपूर मध्ये स्थित आहे; अशी विनंती करतो की, जरी या देशात राहणारे समस्त लोक त्या सुखशांतीमुळे, ज्या महामान्य कैसरा: हिन्द'च्या निष्पक्षन्याय, औदार्यता आणि स्नेहपूर्ण व्यवहारामुळे प्राप्त होत आहे आणि सार्वजनिक शांती आणि जनतेच्या भरभराटीसाठी जे कोटयावधी रूपयांची व्यवस्था आणि दानशीलतेद्वारे समोर आली आहेत. माझ्या मते, आदरणीय महामान्य महाराणी (परमेश्वर आपली प्रतिष्ठा सदा ठेवो)साठी, काहींना वगळता जे अजाणतेमुळे जनावरांसारखे जीवन व्यतित करत आहेत, (इतर सर्व) आपल्या विवेक, बुद्धी आणि परोपकाराची जाणीन ठेवून निरंतर प्रेम आणि आज्ञापालन करतात; परंतु या सेवकाला त्या ओळख आणि जानकारीच्या कारणांमुळे, ज्या ह्या श्रेष्ठ सरकारच्या बाबतीत मला प्राप्त आहे, जे मी आपल्या पुस्तक तोहफा कैसरया:(महाराणीला भेट) मध्ये विस्तारपूर्वक लिहून ठेवले आहे. त्याची प्रामाणिकपेणची उच्च पातळी, प्रेम आणि आज्ञापालनाची उत्कटता महामान्य महाराणी आणि त्यांच्या आदरणीय अधिकाऱ्यांबद्दल प्राप्त आहे. मी असे

शब्दच मिळवू शकलो नसतो ज्यामध्ये त्या प्रामाणिकतेचा अनुमान वर्णन करणे शक्य झाले असते. या प्रेम आणि निष्ठेला अनुसरूण महाराणीच्या साठ वर्धापनाच्या महोत्सवाच्या आयोजनावर मी एक पुस्तक कैसरः हिन्द'च्या सेवेत लिहून आणि त्याचे नाव "**तोहफा कैसरियाः**" (महाराणीला भेट) ठेवून महामान्याच्या सेवेत उपहारच्या रूपात सादर केले होते आणि मला दृढ विश्वास होता की याच्या उत्तराने मला सम्मनित केले जाईल आणि अपेक्षेपेक्षा जास्त प्रसिद्धीचा कारण ठरेल. या अपेक्षा आणि विश्वासाचे कारण महामान्य कैसराः हिन्द'चे दोन उच्चकोटीचे शिष्टाचार होते, ज्याची संपूर्ण पूर्वीय देशामध्ये चर्चा (धूम) आहे. आणि महामान्य महाराणीच्या विशाल देशासारखी विशालता आणि उदारता अशी अद्वितीय व असमान आहे की याचे उदाहरण दुसऱ्या जागी पहावयास मिळणे असंभव आहे. परंतु मला अतिशय आश्चर्य वाटते की, याविषयी एखाद्या प्रशंसनीय शब्दांपासून देखील मला कृतज्ञ करण्यात आले नाही आणि माझी सदसदविवेकबुद्धी हे मान्य करण्यास मुळीच तयार नाही की तो विनयपूर्वक उपहार अर्थात "तोहफा कैसरियाः" पुस्तक महामान्य महाराणीच्या सेवेत प्रस्तूत केला गेला आणि मी त्याच्या उत्तरातून वंचित राहिलो. नक्कीच याचे दुसरे काही कारण असावे ज्यामध्ये महाराणी कैसरः हिन्द'चा हेतू आणि इच्छा आणि विचारांचा काहीच हस्तक्षेप नसेल. म्हणून ती सदीच्छा जी मी महाराणीविषयी बाळगतो परत एकदा तो भेट अर्थात "तोहफा कैसरियाः"कडे त्यांचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न करू आणि कौतूकास्पद शब्दांनी आनंद प्राप्त करू. याच उद्देशाने हे पत्र पाठवत आहे. आणि मी महामान्य कैसरः हिन्द'च्या सेवेमध्ये काही शब्द वर्णन करण्याचे साहस करत आहे. कारण मी पंजाबच्या एका प्रतिष्ठित मुगलिया कुटूंबातून आहे आणि शीखांच्या

काळापूर्वी माझे वाड-वडील एक स्वतंत्र प्रदेशाचे संस्थानिक होते. आणि माझे पंजोबा मिर्जा गुल मोहम्मद इतके दक्षमनीष महा साहसी, सद्वर्तनीय आणि राज्य कारभार चालवण्यात इतके कुशल व कर्तबगार होते की जेव्हा दिल्लीच्या चुगताई बादशाहाचे राज्य अयोग्यता, भोग-विलास, दृष्टीआड आणि भ्याड प्रवृत्ती च्या कारणामुळे कमजोर झाले तेव्हा मिर्जा गुल साहेबांची कुशलता आणि राजवंशवल्लीतून असल्याचे ध्यानात घेता काही पदाधिकारी त्यांना दिल्लीच्या गादीवर बसवण्याचे प्रयत्न करत होते; परंतु चुगताई बादशाहचे भाग्य आणि आयुष्याचा प्याला भरला होता त्यामुळे हा प्रस्ताव स्वीकारला गेला नाही. आणि शीखांच्या काळात आमच्यावर खूप अत्याचार झाला आणि आमच्या वाडवडिलांना पूर्ण ग्रामीण भागातून निष्कासित करण्यात आले आणि सुख शांतीचे क्षण देखील लाभले नाही. आणि इंग्रजी सरकारच्या आगमनापूर्वीच आमचे संपूर्ण राज्य मातीत मिसळले गेले होते. आणि फक्त पाच गाव आमच्या ताब्यात राहिले आणि माझे वडील मिर्जा गुलाम मुर्तुजा यांनी शीखांच्या काळात मोठ-मोठे आघात सहन केले होते. ते इंग्रज सरकारच्या आगमनाचे अशी वाट पाहत होते की जसे कोणी अतिशय तहानलेला पाण्याची वाट पाहतो. आणि या प्रदेशात इंग्रजी सरकारच्या स्थापनेमुळे इतके प्रसन्न झाले की त्यांना जसे हिरे-मोतींचा खजिनाच मिळाला की काय? ते इंग्रजी सरकारचे शुभ-चिंतक होते, यामुळेच त्यांनी १८५७ च्या युद्धात पन्नास घोडे आणि घोडस्वारद्वारे त्यांची मदत केली होती. आणि या नंतर देखील पुढील आणखीन कोणत्याही मदतीसाठी ते नेहमी तयार होते. आणि जर १८५७ चा बंड आणखीन काहीं काळासाठी राहिला असता तर आणखीन १०० घोडे देऊन सरकारची मदत करण्याची त्यांची तयारी होती. अशाप्रकारे त्यांचे जीवन सरकारचे एकनिष्ठ सेवक म्हणून व्यतित झाले. आणि

माझ्या वडीलाच्या निधनानंतर मी ऐहिक जगापासून विच्छेदित होऊन परमेश्वराच्या ध्यानात विलीन झालो आणि माझ्याकडून इंग्रजांसाठी जी सेवा झाली ती अशी की मी पन्नास हजारच्या जवळपास पुस्तके आणि मासिके, जाहिराती, विज्ञापन छापून प्रकाशित करून या देशात आणि इतर मुस्लिम देशात हे जाहीर केले की ही इंग्रजी सरकार आम्हां मुसलमानांची उपकारी आहे, म्हणून प्रत्येक मुसलमानाचे हे कर्तव्य आहे की या सरकाराच्या सर्व आज्ञांचे पालन करून आणि मनाने त्यांचे कृतज्ञ होऊन त्यांच्यासाठी प्रार्थनारत व्हावे. आणि हे जाहिरात मी विविध भाषांमध्ये अर्थात उर्दू, फारसी आणि अरबी मध्ये लिहून इस्लामच्या समस्त देशांमध्ये प्रसारित केलं, इथपर्यंत की इस्लामचे दोन पवित्र स्थळे, मक्का आणि मदिनामध्ये पुष्कळ प्रमाणात प्रकाशित करण्यात आले. आणि रोम'ची राजधानी कुस्तुनतुनिया, सिरिया, इजिप्त, काबूल आणि अफगानिस्तानच्या विविध शहरात, जिथपर्यंत शक्य होते तिथपर्यंत प्रकाशित केले गेले; ज्याचा परिणाम असा झाला की लाखो लोकांमध्ये अज्ञानी मुल्लांमुळे जिहादबद्दल असलेली चूकीची धारणा संपुष्टात आली. इंग्रजी राजवटीसाठी केलेल्या ह्या सेवेचा मला अभिमान वाटतो; कारण देशातील कोणत्याही मुसलमानाला अशा प्रकारची सेवा करण्याचे सौभाग्य प्राप्त झालेले नाही. आणि मागील २२ वर्षांपासून जी सेवा मी करत आहे ते कोणत्याही प्रकारचे उपकार नाही कारण मी या गोष्टीचे स्वीकार करतो की या तेजस्वी राजवटामुळे आम्हाला आणि आमच्या वाडवडीलांना अत्याचाराच्या भट्टीतून सुटका प्राप्त झाले. म्हणून मी माझ्या कुटूंबासह अशी प्रार्थना करतो की हे परमेश्वरा! कृपाशील अशा कैसरा: हिन्द'ला पर्याप्त काळापर्यंत आमच्यावर सुरक्षित ठेव आणि त्यांच्या कार्यात त्यांची सहाय्यता कर आणि त्यांच्या वैभवात वाढ कर.

मी तोहफा कैसरिया मध्ये, जो कैसरा:हिन्द'च्या सेवेत पाठवले आहे, हीच परिस्थिती आणि सेवा आणि निमंत्रणाचे निवेदन केले आहे आणि महामान्य महाराणीच्या व्यापक नैतिकतेवर नजर ठेवून दररोज उत्तरासाठी आशान्वित होतो आणि आताही आहे. माझ्या विचारात हे शक्यच नाही की माझ्या सारख्या प्रार्थना करणाऱ्याची कृपापूर्वक भेट, जी पूर्ण मनाने रचली गेली होती ती महामान्य महाराणी कैसरा: हिन्द'च्या सेवेत पोहोचली आणि मग महाराणींनी त्याचा उत्तर दिला नाही; असे होऊ शकत नाही, जर तो त्यांच्यापर्यंत पोहोचला असता तर उत्तर नक्कीच मिळाला असता. म्हणून महारानींच्या अत्योच्च नैतिकतेचा बोध असल्यामुळे मी पुन्हा एकदा आठवणीसाठी एक पत्र लिहण्यास प्रवृत्त झालो आणि हे पत्र लिहण्यासाठी माझ्या मनाने माझ्या हाताला विवश केले आहे. परमेश्वर हे पत्र महाराणी पर्यंत पोहोचव आणि त्यांच्या मनात आपले वैभव अवतरीत करून, त्यांच्याप्रती असलेली माझी सदीच्छा त्यांच्या मनात टाक, ज्यानंतर ते मला उत्तराने कृतज्ञ करातील. आणि महामान्य महाराणी कैसरा: हिन्द'च्या सेवेत मलाही आनंदाची बातमी सांगण्यातही फार अभिमान आहे की जसे की, पृथ्वीवर तसेच पृथ्वीच्या संसाधनातून परमेश्वराने पूर्ण दयेने आमच्या कैसरा हिन्द (परमेश्वर त्यांच्या प्रतिष्ठेला सदैव स्थापित ठेवो) च्या सरकारला या देशात तसेच अन्य देशात स्थापित केले आहे, जेणे पृथ्वी न्याय आणि शांतीने व्यापून जाईल, तसेच त्याने अवकाशातून इरादा केला आहे की या महाराणी कैसर: हिन्द'च्या चांगल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी जे न्याय, शांती, जनसामान्यांची समृद्धि, उपद्रव करणाऱ्यांवर प्रतिबंध, आचार-व्यवहार ची दुरूस्ती आणि आदिवासींची परिस्थिती सुधारनेही आहेत; त्यांच्या चांगल्या काळात आपल्याकडून आणि अप्रत्यक्षपणे तसेच अवकाशातून अशी आध्यात्मिक प्रणाली

स्थापित करू जी महामान्य महाराणीच्या चांगल्या उद्दीष्टांचे समर्थन करणारी असावी आणि जी शांतता आणि मैत्रीपूर्ण वातावरण, जे त्या निर्माण करू इच्छितात, परमेश्वर आकाशीय माध्यमातून त्यामध्ये सहकार्य करो. अतः त्याने त्याच्या शाश्वत वचनानुसार येशू मसीहच्या येण्याबद्दल होते, मला आकाशातून पाठवले आहे, जेणेकरून मी त्या दिव्यपुरूषाच्या रंगात रंगून, जो बैतुल्लाह मध्ये जन्मला आणि नासिरा मध्ये ज्याचा पालनपोषण झाला, महाराणीच्या नितीमान आणि चांगल्या उद्दीष्टात मदत करण्यात व्यस्त होवू. त्याने मला आपला आशीर्वाद देऊन अपेक्षित मसीह बनवला जेणे करून तो महाराणीच्या चांगल्या उद्दीष्टांना स्वतः अवकाशातून मदत करेल.

हे शुभ अभिनंदनीय कैसरा, परमेश्वर तुला सुखरूप ठेवो तुझं जीवन, प्रतिष्ठा आणि यशामुळे आमच्या हृदयांना प्रसन्नता मिळू दे. अशावेळी तुझ्या सरकारच्या काळात जी प्रामाणिकपणाने पुरेपूर आहे, परमेश्वराकडून मसीहाचे येणे ही साक्ष देते की समस्त सम्राटांमध्ये तुझे अस्तित्व शांतीप्रियता व्यवस्थापान कार्यक्षमता, सार्वजनिक सहानुभूती आणि न्याय आणि हक्क देण्यात अग्रेसर आहे. मुसलमान आणि ख्रिस्ती दोन्हीपक्ष ही गोष्ट मानतात की अपेक्षित मसीह येणार आहे. परंतु याच युगात आणि काळात जेव्हा लांडगा आणि शेळी एकाच घाटावर पाणी पितील आणि सापांशी लहान मुले खेळतील. म्हणून हे महाराणी कैसरा: हिन्द हा तुझाच काळ आणि तुझेच युग आहे. ज्यांचे डोळे असतील त्यांनी पहावे. आणि जे पक्षपातापासून दूर आहेत त्यांनी समजून घ्यावे. हे महामान्य महाराणी हा तुझाच शासनकाळ आहे ज्यांनी क्रूर आणि गरीब जनावरांना एकाच स्थानावर जमा केले. प्रामाणिक लोक जे लहान मुलांसमान आहेत ते दुष्ट सापांशी खेळतात आणि तुझ्या शांतीमय छायेखाली त्यांना कशाचीही भीती

वाटत नाही. आता तुझ्या शासनकाळापेक्षा जास्त शांतीपूर्वक आणखी कोणता शासनकाळ असेल, ज्यामध्ये अपेक्षित मसीह येणार? हे महामान्य महाराणी ही तुझी पवित्र इच्छा आहे, जी आकाशीय मदतीला आपल्याकडे आकर्षित करीत आहे. आणि तुझ्या सदीच्छांचे चुंबक आहे ज्यामुळे आकाश दयेने पृथ्वीकडे झूकून येत आहे. म्हणून तुझ्या शानसकाळाव्यतिरिक्त कोणते शासनकाळ असे नाही जे अपेक्षित मसीहच्या उत्क्रांतीसाठी योग्य असेल. म्हणूनच परमेश्वराने तुझ्या प्रकाशमान काळातच आकाशातून एक प्रकाश खाली अवतरवला आहे. कारण प्रकाश-प्रकाशाला आपल्याकडे ओढत असतो आणि अंधकार-अंधकाराला आपल्याकडे ओढतो. हे तेजस्वी महाराणी! ज्या पुस्तकांमध्ये स्पष्टपणे अपेक्षित मसीहाच्या आगमनाची खबर होती त्या ग्रंथात स्पष्टपणे तुझ्या शांतीपूर्ण काळाचे संकेत सापडतात; पण हे आवश्यक होते की अपेक्षित मसीह याच प्रकारे जगात येईल ज्या प्रमाणे एलिया नबी (प्रेषीत) युहन्ना'च्या रूपात आला होता. अर्थात युहन्ना आपल्या प्रकृती आणि स्वभावाने परमेश्वराजवळ एलिया बनला. इथेही असेच झाले की एकाला तुझ्या चांगल्या युगात येशूची प्रकृती आणि स्वभाव प्रदान केलं. आणि त्यामुळे तो मसीह म्हणवला आणि त्याचे आगमन अपेक्षित होते. कारण की परमेश्वराच्या पवित्र लिखाणाचे टळणे अशक्य आहे. हे संपूर्ण प्रजेचा अभिमान, महामान्य महाराणी! ही परमेश्वराची जुनी परंपरा आहे की जेव्हा काळाचा सम्राट, प्रामाणिक आणि जनहितासाठी प्रयत्न करणारा असेल तेव्हा तो आपल्या सामर्थ्यानुसार सार्वजनिक शांती आणि सौहार्द प्रसृत करण्याची व्यवस्था करतो. आणि लोकांच्या अंतर्गत चांगले परिवर्तन घडवण्यासाठी त्याचे अंतःकरण दुःखी होते तेव्हा त्याच्या मदतीसाठी आकाशातून परमेश्वराची दया उतरुन येते. आणि त्याच्या शौर्य आणि

इच्छेनुसार ईश्वरीय माणूस पृथ्वीवर पाठवला जातो. त्या सामर्थ्यशील सुधाराकाच्या अस्तित्वाला या न्यायवान सम्राटाचा प्रामाणिकपणा, हिम्मत आणि लोकांसाठी सहानुभूती निर्माण करते. हे तेव्हा होते जेव्हा एक न्यायवान सम्राट जगाचा मुक्तिदाता म्हणून जन्माला येऊन पूर्ण हिम्मतीने आणि मानवजातीच्या हिताच्या दृष्टीकोनातून नैसर्गिकरित्या एक अध्यात्मिक मुक्ति देणाऱ्याच्या शोधात असतो. याच प्रकारे हजरत येशू मसीह (अ.स.)च्या काळात देखील असे घडले. कारण की त्यांच्या काळातील कैसर-ए-रूम एक चांगला हेतू ठेवणारा मनुष्य होता, त्याला नको होते की पृथ्वीवर अत्याचार व्हावे. तो मानवजातीच्या कल्याणाचा आणि मुक्तिचा अभिलाषी होता. तेव्हा आकाशातून परमेश्वराने तो प्रकाश देणारा चंद्र नासीराच्या भूमीतून उगवला; अर्थात येशू ख्रिस्त. म्हणून जसे नासीरा या शब्दाचा अर्थ इब्रानी भाषेत शीतलता, ताजेपणा आणि हिरवळ होते. हीच नैतिकता लोकांच्या मनात समृद्ध होवो. हे आमची प्रिय कैसरा: हिंद! तुला परमेश्वर दीर्घकाळ सुखरूप ठेवो. तुझा प्रामाणिकपणा प्रजेची खरी सहानुभूती त्या कैसर-ए-रूम पेक्षा कमी नाही. किंबहुना आम्ही ठामपणे सांगतो की त्यापेक्षा जास्त आहे. कारण की तुझ्या दृष्टीखाली जेवढी गरीब जनता आहे, ज्यांच्यावर तू दया करू इच्छित आहेस आणि ज्याप्रकारे प्रत्येक अंगाने आपल्या निराधार प्रजेची शुभचिंतक आहेस आणि ज्या प्रकारे तु शुभचिंता आणि प्रजा पालनाचे नमूने दाखवले आहेत. ही गुणवत्ता आणि भरभराट पहिल्या कैसरा मध्ये पाहायला मिळत नाही. यामुळे तुझ्या हाताचे कार्य जे संपूर्ण नितीमान आणि दानशिलतेने रंगलेले आहे, सर्वांत जास्त या गोष्टीला पसंत करतात की ज्याप्रकारे तु हे महामान्य महाराणी आपल्या संपूर्ण प्रजेची मुक्ती, व्यवस्था आणि सोयीसाठी चिंतित आहे. आणि प्रजेच्या

पोषणाच्या उपायांमध्ये व्यस्त आहे. (याकरिता)परमेश्वरही आकाशातून तुझी मदत करो. तर हा अपेक्षित मसीह, जो जगात आला तो तुझ्याच अस्तित्वाच्या कृपा, दया, नैतिक व्यवहार आणि खरी सहानुभूतीचे परिणाम आहे. परमेश्वराने तुझ्या शासन काळात, जगातील सहानुभूती आठवून आकाशातून आपल्या अपेक्षित मसीहाला पाठवले आणि तो तुझ्याच देशात आणि तुझ्याच सिमेमध्ये जन्माला आला; कारण की जगाला एक साक्ष असावी की पृथ्वीच्या न्यायाच्या मालिकेने आकाशाच्या मालकाला आकर्षित केले. आणि तुझ्या दयेच्या मालिकेने आकाशात एक दयेची मालिका स्थापित केली. जेणेकरून या मसीह चा जन्म सत्य आणि असत्येला विभाजित करण्यासाठी जगात एक शेवटचा आदेश आहे ज्याच्या अनुसार अपेक्षित मसीह'ला (हकम) मध्यस्थ मानले जाते. यासाठी नासीरा प्रमाणे, ज्यामध्ये ताजेपणा आणि हिरवळच्या युगाकडे संकेत होता. या मसीहच्या गावाचे नाव 'इस्लामपूर काझी माजी' ठेवण्यात आले, कारण 'काझी' या शब्दामुळे परमेश्वराच्या त्या अंतिम शिर्षकाचे संकेत आहे ज्यातून निवडलेल्या लोकांना शाश्वत कृपेची चांगली बातमी प्राप्त होईल आणि अपेक्षित मसीह'चे नाव जे (हकम) मध्यस्थ आहे त्याच्याकडेही छोटा संकेत असावा आणि 'इस्लामपूर काजी माझी' त्यावेळी त्या गावाचे नाव ठेवले होते ज्यावेळी बाबर बादशाहच्या शासन काळात या देशातील माझ्या प्रदेशाचे मोठे क्षेत्रफल संस्थान म्हणून माझ्या वाड-वडिलांना मिळाले आणि हळूहळू हे राज्य स्वतंत्र स्वशासित क्षेत्र बनले आणि वारंवार वापरात आल्यावर 'काझी' हा शब्द 'कादी' मध्ये परिवर्तित झाला, नंतर आणखीन बदल होऊन कादियां झाला, अतः नासिरा आणि इस्लामपूर काझी हे शब्द मोठे अर्थपूर्ण शब्द आहेत. यातून एक अध्यात्मिक ताजेपणाकडे मार्गदर्शन होते, आणि दुसरा अध्यात्मिक

निर्णयाकडे जे अपेक्षित मसीह'चे कार्य आहे. हे महामान्य महाराणी कैसरः हिन्द परमेश्वर तुला प्रदीर्घ आणि आनंदी जीवन देवो. तुझे शासन आणि कार्यकाळ अभिनंदनीय आहे, कारण की परमेश्वराचा हात तुझ्या उद्देशांचे समर्थन करत आहे. तुझी प्रजेशी सहानुभूती आणि प्रामाणिकपणाचे मार्ग देवदूत साफ करत आहेत. तुझ्या न्यायाचे सूक्ष्म बाष्प ढगांप्रमाणे उठत आहेत ज्याच्यामुळे संपूर्ण देशाला वंसताचा ऋतू मिळत आहे. दुष्ट आहे तो मनुष्य जो तुझ्या शासनकाळाची किंमत जाणत नाही. आणि नीच आहे तो, जो तुझ्या उपकाराचा कृतज्ञ नाही. खरेतर हा विषय प्रमाणित आहे की मनाला मनाशी जोडतो. त्यामुळे मला काही आवश्यकता नाही की माझ्या भाषेचा वापर करून या गोष्टीला व्यक्त करू की मी आपल्यावर मनापासून प्रेम करतो आणि माझ्या हृदयात असाधारण प्रेम अणि प्रतिष्ठा आहे.

आमची रात्रंदिवसाची प्रार्थना आपल्यासाठी वाहत्या पाण्याप्रमाणे सुरू आहेत. आणि आम्ही सक्तिच्या राजकारणाच्या अधीन नसून तुमच्या विविध प्रकारच्या गुणांनी आमच्या हृदयांना आपल्याकडे संमोहित करून घेतले आहे. हे अभिनंदनीय कैसरःहिन्द तुला ही तुझी प्रतिष्ठा आणि कीर्ति यांचे अभिनंदन असो.

परमेश्वराची नजर त्या देशावर आहे ज्या देशावर तुझी नजर आहे. परमश्वराचा दयेचा हात त्या प्रजेवर आहे ज्याच्यावर तुझा हात आहे. तुझ्याच पवित्र नियतीमुळे परमेश्वराने मला पाठवले आहे. जेणेकरून संयम, पवित्र आचरण आणि मैत्रीचे मार्ग जगात पुन्हा एकदा स्थापन करू. हे महामान्य महारणी कैसरः हिन्द, मला परमेश्वराकडून हे ज्ञान दिले गेले आहे की एक दोष मुस्लिमांनामध्ये आणि एक दोष येशू ख्रिस्तांच्या अनुयायीं मध्ये आहे, ज्यामुळे ते खऱ्या आध्यात्मिक जीवनापासून दूरावले आहेत. आणि हा दोष त्या दोन समूहांना एक

होण्यात अडचण निर्माण करत आहे. आणि तो परस्परांमध्ये विभाजन करत आहेत. आणि ते हे, की मुस्लिमांमध्ये ही दोन गोष्ट्या किंवा विचारधारां फार धोकयाचे आणि चूकीचे आहेत, की ते धर्मासाठी तलवार उगारणे, आपल्या धर्माचा एक स्तंभ समजतात. आणि या उन्मादातून एका निर्दोषाला मारून असे समजतात की जणू पुण्याचे कार्य केले आहे. आणि जरी या ब्रिटीश इंडिया'च्या देशातील पुष्कळ मुसलमानामधील ही आस्था सुधारित झाली आहे आणि माझ्या २२-२३ वर्षाच्या प्रयत्नांनंतर स्वच्छ झाली आहे; परंतु यात काही शंका नाही की काहीं देशांमध्ये आजतागायत हा विचार प्रखरतेने आढळतो. ज्या लोकांनी इस्लामचा सार लढाई आणि जुलुम यालाच समजले आहे. पण वास्तविक पाहता ही विचारधारा सर्वस्वी चूकीची आहे. पवित्र कुरआन मध्ये आदेश आहे, की धर्माच्या प्रसारासाठी तलवार उचलू नका. आणि धर्माची वैयक्तिक वैशिष्टे सादर करा आणि उदात्त उपदेश प्रस्तूत करून त्यांना आपल्याकडे आकर्षित करा. आणि असा विचार करू नका की इस्लाममध्ये प्रारंभी तलवारचा आदेश झाला, कारण की ती तलवार इस्लामच्या प्रसारासाठी नाही उचलली गेली, तर शत्रूच्या आक्रमणापासून स्वतःची रक्षा करण्यासाठी उचलली गेली होती, शांतता स्थापन करण्यासाठी केली गेली होती. आणि बळजबरीने धर्म प्रसारण उद्देश नव्हता. दुर्दैवाने हा दोष जाणूनबुजून अडाणी मुस्लिमाच्यामध्ये अजूनही अस्तित्वात आहे. ज्याच्या सुधारण्यासाठी माझी पन्नास हजारहून अधिक छोटया पत्रिका, मोठी पुस्तके, विज्ञापने या देशात तथा अन्य देशात प्रकाशित झाली आहेत. आणि मला आशा आहे की लवकरच अशी वेळ येईल की मुसलमान या दोषापासून पवित्र होतील.

आमच्या समाजातील मुसलमानांमध्ये दुसरा दोष हा आहे की

ते अशा एका रक्तरंजीत मसीह आणि महदी'च्या प्रतिक्षेत बसलेले आहेत जो त्यांच्या मते जगाला रक्तपाताने भरून टाकेल; परंतु हा विचार चूकीचा आहे. आमच्या विश्वसनीय पुस्तकात लिहले आहे की अपेक्षित मसीह कोणतीही लढाई करणार नाही आणि तलवारही उचलणार नाही किंबहुना तो प्रकृती आणि आचरणामध्ये येशू मसीह सारखा असेल. आणि त्याच्या रंगात असा रंगलेला असेल जसे हुबेहुब तोच आहे. हे दोन दोष सध्याच्या मुस्लिमांनामध्ये आहेत. ज्यामुळे त्यांच्यापैकी अधिकतर लोक इतर समुदायांशी द्वेषभाव बाळगतात, पण मला परमेश्वराने यासाठी पाठवले आहे की मी हे दोष दूर करावे. आणि 'काझी' आणि 'हकम' हे शब्द जे मला प्रदान केले गेलेत ते या निर्णयासाठी आहेत.

या उलट ख्रिस्तींमध्येही एक चूक पहायला मिळते, की ते मसीह सारख्या देवदूताबद्दलही, ज्याला पवित्र इंजीलमध्ये तेजस्वी प्रकाश म्हटले आहे. (अल्लाह क्षमा करो) त्याच्या अस्तित्वाला तिरस्कराचे मूर्त बनवतात. आणि 'लानत' शब्दातून जोडतात आणि त्यांना माहीत नाही की 'लअन' आणि 'लानत' हा इब्रानी (हिब्रू) आणि अरबीमध्ये समान आहेत. याचा अर्थ असा आहे की माणसाचे हृदय परमेश्वरापासून पूर्णपणे विमुख, दूर आणि अपवित्र झाले, ज्या प्रमाणे कुष्ठ रोगाने शरीर बाद आणि सदोष होतो. आणि अरब आणि इब्रानीचे मातृभाषी या गोष्टीवर सहमत आहेत, की 'मलऊन' आणि 'लानती' कोणालाही फक्त त्याच स्थितीत असल्यावर म्हटले जाते जेव्हा त्यांचे मन खरोखर देवावर प्रेम, ब्रह्मज्ञान आणि आज्ञापालनाचा संबंध तोडतो आणि सैतानाचा असा आज्ञाकारी बनतो जणू सैतानाचा पुत्र असावा आणि परमेश्वरापासून विमुख आणि परमेश्वर त्याच्यापासून विमुख व्हावा. परमेश्वर त्याचा शत्रू आणि तो

परमेश्वराचा शत्रू होऊन जाईल. म्हणून 'लईन' हे सैतानाचे नाव आहे, मग तेच नाव हजरत मसीह'साठी वापरणे अणि त्यांच्या पवित्र आणि उज्वल हृदयाला धिक्कार असणाऱ्या सैतानाच्या अपवित्र हृदयाशी समानता देणे आणि त्याच्या कथनानुसार परमेश्वरापासून उत्पन्न आहे आणि पूर्णपणे प्रकाशमय आहे आणि जो आकाशीय आहे आणि जो ज्ञानाचे द्वार आहे आणि जो परमेश्वराकडे पोहोचण्याचा मार्ग आहे आणि परमेश्वराचा वारस आहे. त्याच्याबद्दल हे समजणे की लानती आहे अर्थात पमरेश्वराचा धिक्कारीत होऊन परमेश्वराचा शत्रू होऊन किंवा काळया मनाने आणि विमुख होऊन आणि परमेश्वरीय ज्ञानापासून अंध होऊन सैतानाचा उत्तराधिकारी झाला आहे आणि या उपाधीचा पात्र झाला आहे, जो की विशेषकरून सैतानासाठी उपयोग होतो, अर्थात लानत. ही एक अशी आस्था आहे की ऐकल्यानेच मनाचे तुकडेतुकडे होऊन जातात. आणि शरीर भीतीने थरथरते. काय परमेश्वराच्या मसीहाचे हृदय परमेश्वापासून विमुख झाले, जसे सैतानाचे हृदय? काय परमेश्वाच्या मसीहावर अशी वेळ आली की ज्यामुळे तो परमेश्वरापासून विमुख आणि वास्तवात परमेश्वराचा शत्रू झाला. ही फार मोठ चूक आहे आणि फार मोठी असभयता आहे. जवळ आहे की यामुळे आकाश टुकडेटुकडे होऊन जाईल. निष्कर्ष हा आहे की मुसलमानांची जिहाद'ची आस्था(विश्वास) स्पष्ट दृष्टीने एक वाईट आणि निरर्थक कल्पना आहे. आणि ख्रिस्चनांची ही आस्था स्वतःच्या परमेश्वराबद्दल वाईट विचार आहे. जर हे संभव आहे की प्रकाश असताना अंधकार होईल तर हेही संभव आहे की (अल्लाह क्षमा करो) कधी काळी मसीहच्या हृदयाने लानत ची विषारी परिस्थिती आपल्या मध्ये प्राप्त करून घेतली होती. जर मनुष्याची मुक्ति अशा असभ्यतेवर निर्भर आहे तर उचित आहे की कोणाचीही मुक्ति होवू

नये. कारण समस्त अपवित्र लोकांचे मरणे या गोष्टीपेक्षा चांगले आहे की मसीह सारख्या तेजस्वी आणि प्रकाशमानला पथभ्रष्टतेच्या अंधकार, धिक्कार आणि परमेश्वराच्या शत्रू त्याच्या गर्तेत बुडणार ठरवला जावा. म्हणून यासाठी मी प्रयत्न करत आहे, की मुसलमानांची ही आस्था आणि ख्रिश्चनांची ही आस्था सुधरावी आणि मी परमेश्वराचे आभार मानतो की त्याने माझ्या दोन्ही उद्देशात मला यश प्रदान केले आणि माझ्याबरोबर अवकाशी संकेत आणि परमश्वराचे चमत्कार होते. म्हणून मुसलमानांची समजूत काढण्यासाठी जास्त कष्ट करावे लागले नाही. हजारो मुसलमान परमेश्वराचे अद्‌भुत आणि विलक्षण संकेतांना पाहून माझे आज्ञाधारक झाले आणि त्यांनी धोकादायक श्रद्धेचा त्याग केला, जी त्यांच्या हृदयात भरली होती आणि माझे अनुयायी त्या सरकारचे शुभचिंतक बनले जी ब्रिटीश इंडिया नावाने आहे, आणि सरकारसाठी त्यांचे स्नेह पाहून मला आनंद होतो. आणि ख्रिश्चनांचा दोष दूर करण्यासाठी परमेश्वराने जी माझी मदत केली आहे त्याचे आभार व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. आणि तेही की भरपूर भक्कम तर्क आणि नितान्त अशा सुदृढ कारणांमुळे सिद्ध होऊ शकले की मसीह (येशू) यांचा मृत्यु क्रूसावर चढवल्याने नाही झाला तर परमेश्वराने त्या पवित्र पैगंबराला (देवदूताला) क्रूसवरून सुरक्षितपणे वाचवले. आणि परमेश्वराच्या कृपेमुळे मरण न पावता तसेच जिवंतच त्याना कबरेत बेशुद्ध अवस्थेत दाखल करण्यात आले आणि जिवंतच कबरेतून काढले गेले. जसे त्यांनी इंजील मध्ये स्वतःबद्दल सांगितले होते की, माझी स्थिती युनस पैगंबरासारखी होईल. आपल्या इंजीलमध्ये हे शब्द आहेत की, माझी परिस्थिती प्रेषित युनूस'च्या परिस्थिती समान आहे. इंजीलमध्ये त्यांचे शब्द आहेत की, मी, (तुम्हाला) युनूस पैगंबराचा चमत्कार दाखवेन, आणि त्यांनी तो चमत्कार प्रदर्शित केला

की जीवंत कबरेत दाखल झाले आणि जीवंतच कबरेतून निघाले. ह्या त्या गोष्टी आहेत ज्याची जाणीव आम्हाला इंजीलद्वारे होते. परंतु या खेरीज एक मोठी आनंदाची बातमी जी आम्हाला मिळाली ती अशी की येशू ख्रिस्तांची कबर श्रीनगर काश्मिर'मध्ये स्थित आहे आणि ही गोष्ट या निर्णयाला पोहोचली आहे, की यहूदीयांच्या देशातून पलायन करून 'नसीबैन'च्या मार्गाने अफगानिस्तानमध्ये आणि काही काळापर्यंत नुअमान पर्वतामध्ये राहिले. आणि मग काश्मीर'ला आले आणि एकशे वीस वर्षाच्या आयुष्यानंतर त्यांचे श्रीनगर'मध्ये निधन झाले, आणि 'मुहल्ला खानीयार' मध्ये त्यांची समाधी आहे. याविषयी मी एक पुस्तक लिहिले आहे, ज्याचे नाव आहे ''**मसीह हिन्दुस्तान में**''आहे, हा एक मोठा विजय आहे जो मला प्राप्त झालं. आणि मी जाणतो की लवकरच किंवा काही वेळानंतर याचे परिणाम पहायला मिळेल की, हे दोन महान धर्माचे लोक जे फार काळापासून दूरावलेले आहेत, ते दूध आणि साखर सारखे मिसळून जातील आणि अनेक कलहांना तिलांजली देऊन प्रेमाने आणि मित्रतापूर्वक परस्परांशी प्रेमाने वागतील आणि अवकाशातही असे होण्याचे निर्देश झाले आहे. म्हणूनच इंग्रजी सरकारचेही या दोन धर्मीयांमध्ये समेट घडवण्यावर फार लक्ष आहे. जसे की देशद्रोहाच्या कायद्यातील काही नियमांत ते प्रकट झाले आहे. अस्सल भेद असे की, ज्या प्रकारचे मंथन आकाशात घडते त्याच्या प्रतिकृतीचे विचार सरकारच्या हृदयात उत्पन्न होतात. अतः आमच्या महामान्य महाराणीच्या चांगल्या नियतीमुळे, परमेश्वराने आकाशात असा बंदोबस्त केला की ख्रिश्चनांमध्ये आणि मुसलमानांमध्ये अशी एकता व्हावी की यांना 'दोन राष्ट्र'(समुदाय) म्हणवले जाऊ नये.

आता यानंतर येशू ख्रिस्तांच्या बाबतीत कोणी बुद्धीमान ही

आस्था कदापी ठेवणार नाही की कोणी काळी (परमेश्वर क्षमा करो) त्यांचे हृदय लानत'च्या विषारी परिस्थिती दूषित झाले होते. कारण क्रूसावर मरणे हेच लानत'ची व्याख्या होती. म्हणून जेव्हा सूळावरचे मरण सिद्ध झाले तर उलट हे सिद्ध झाले की त्यांच्या प्रार्थनेमुळे, जी रात्रभर त्यांनी बागेत केली. आणि (फरिश्ता) देवदूताच्या इच्छेनुसार, जो पैलातूसच्या पत्नीच्या स्वप्नात येशूला वाचवण्याची शिफारीश घेऊन प्रकट झाला होता.[१]* आणि स्वयं येशू ख्रिस्ताच्या या उदाहरणानुसार जो त्यांनी पैगंबर युनस यांचा तीन दिवस माशाच्या पोटात जीवंत राहण्याला आपल्या निष्कर्षाचा नमूना ठरवला होता. परमेश्वराने त्याला क्रूस आणि त्याचे परिणाम; अर्थात धिक्कारापासून त्याला वाचवले. आणि त्यांची वेदनापूर्ण साद ''ईली ईली लिमा सबकतानी''(हे माझे परमेश्वरा तू आज मला एकटा का सोडलास!), परमेश्वराच्या दरबारात कबूल झाली. हा उघडउघड पुरावा आहे ज्यामुळे प्रत्येक सत्याभिलाषीचे हृदय सहसा आनंदाने उत्साहित होईल. म्हणून निःसंदेह ही आमची महारणी कैसरः हिन्द'च्या कृपांची बक्षीस आहे ज्याद्वारे येशू ख्रिस्तांच्या पदराला लागलेल्या अनुचित कलंक १९०० वर्षांनंतर स्वच्छ झाले.

आता या पत्राला जास्त लांबवणे मला उचित वाटत नाही. महाराणीबद्दल असलेली प्रामाणिकता, आज्ञाधारकता आणि कृतज्ञता सादर करण्याचा जो उत्साह माझ्या मनात होता त्याअनुसार मी प्रकट

---

*ही गोष्ट कुठल्याही प्रकारे स्वीकार्य योग्य नाही आणि या गोष्टीला कोणत्याही बुद्धिमानाची सद्सदविवेकबुद्धी कबूल करणार नाही की परमेश्वराने दृढ निश्चय केला की येशू ख्रिस्ताला फाशी द्यावी परंतु त्याचा देवदूत अकारण येशूला सोडवण्यासाठी वावरत असे, कधी पैलातूसच्या हृदयामध्ये येशूचे प्रेम निर्माण करायचा आणि त्याच्या तोंडातून हे शब्द पडे की मी येशू मध्ये कोणताही गुन्हा पाहात नाही. तर कधी पैलातूसच्या पत्नीच्या स्वप्नात जाऊन म्हणत असेल की जर येशू मसीहला सलीब मिळाली तर यात तुमची खैर नाही. ही कशी विचित्र गोष्ट आहे की देवदूताचा परमेश्वराविरूद्ध मतभेद आहे.

करण्यात असमर्थ राहिलो, म्हणून या असमर्थ स्थितीत मी प्रार्थनेच्या माध्यमातून समाप्त करू इच्छितो की हे परमेश्वरा! जो पृथ्वी आणि आकाशाचा स्वामी आहे आणि जो शुभकार्याचे शुभप्रतिफल देतो. तो आकाशावरून ह्या उपकारी कैसरःहिन्द'ला आमच्याकडून शुभ प्रतिफल दे. आणि ती कृपा तिला प्रदान कर जी या जगापर्यंतच सिमीत नसावी अपितू खरी आणि स्थायी समृद्धि जी मरणोपरान्त प्राप्त होईल, प्रदान कर. आणि शाश्वत सुख प्राप्त करण्याचे साधन तिला दे. हे परमेश्वरा तू आपल्या देवदूतांना आदेश कर की ह्या शुभचरण महाराणीला, जी प्रजेवर इतकी दया-दृष्टि ठेवणारी आहे. आपल्या अशा ईशवाणीने प्रकाशमान कर, जी विजेच्या प्रकाशाने एका क्षणात उतरते आणि संपूर्ण ह्रदयात प्रकाशमान होऊन कल्पनेच्या पलिकडे परिवर्तन करते. हे विधाता! आमच्या महामान्य कैसरः हिन्द'ला कायम प्रत्येक गोष्टीत प्रसन्न ठेव आणि असे कर की तुझ्याकडून एक सर्वोच्च शक्ति तिला तुझ्या प्रकाशाकडे खेचून शाश्वत आनंदात दाखल करे. तुझ्यापुढे कोणतीच गोष्ट अशक्य नाही. परमेश्वर असेच करो. (आमीन) सर्वजण म्हणा, परमेश्वर असेच करो (आमीन).

२० ऑगस्ट १८९९ इ.स.

विनंतीकर्ता

मिर्ज़ा गुलाम अहमद, क़ादियान

जिल्हा गुरदासपूर, पंजाब